चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२९ मे., २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्करीवर कार्यवाही

## एका आरोपीसह १३ लक्ष ६५ हजाराचा मुदद्देमाल हस्तगत

दिनांक २९/०५/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन बल्लारशाह परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी वाहनाने दारू आणुन सुभाष चौक बल्लारशाह येथील सम्मया जक्कु यांचे घरी खाली करीत आहे. अशा माहिती वरून स्थागुशा पथक सुभाष चौक येथे पोहचले असता काही इसम एका चारचाकी वाहनातुन दारूच्या पेटया उतरवित असतांना दिसुन आले. यावरून पोलीसांनी छापा टाकला असता वाहनामध्ये अवैध रित्या देशी दारूचा साठा मिळुन आल्याने आरोपी नामे सम्मया जक्कु वय ४२ रा. सुभाष वार्ड बल्लारशाह यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी आणि ५५ पेटया देशी दारू किं. ५,५०,०००/—रू, एक रेनॉल्ट डस्टर एम एच १८ एजे ४१४१ किं. ८,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. १५,०००/—रू असा एकुण १३,६५,०००/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात, स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी.कोकाटे यांचे नेतृत्वात पोना. नईम पठाण, पोशि. रविंद्र पंधरे, जावेद सिददीकी, अमोल यांनी पार पाडली.

———————————————————————————————————